पाणीपुरवठ्या वर सध्या दुरुस्ती व देखभाली करिता व घेतलेल्या कर्जाच्या परतफेडी करिता सन २०१७–२०१८ मध्ये रक्कम रु. ६९.६५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. सध्या महानगरपालिकेने १५ एम.एम. घरगुती वापरा करिता वार्षीक आकारणी रु. २७५६/– व बिगर घरगुतीसाठी रक्कम रु. ११,५५६/– इतका दर ठेवलेला आहे. सन २०१७–२०१८ मध्ये रक्कम रु. ६९.६५ कोटी एवढा खर्च लागणार असून, कर्ज परतफेड, वीज बिल, रसायने, सेवक पगार, देखभालीचा खर्च विचारात घेऊन पाणीपुरवठा विभागाकडून र.रू. ६२.१६ कोटी अपेक्षित धरले असले तरी रक्कम रू. ७.४९ लाख एवढी तूट येणारच आहे.

उजनी जलाशयासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या खर्चावरील मुद्दल व हुडको या वित्तीय संस्थेस अदा करावयाची थकबाकीची अंदाजे रक्कम रु.८.०९ कोटी निघते. परंतु या पैकी सन २०१७–२०१८ या अंदाजपत्रकात मुद्दल व व्याजाची रक्कम भरण्यासाठी रक्कम रु. ६.०० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. याचाही विचार महानगरपालिकेने करणे आवश्यक ठरले आहे.

**आजला सोलापूर शहराचा केंद्राच्या स्मार्ट सिटी योजनेमध्ये समावेश झालेला आहे. सदर स्मार्ट सिटी योजना करिता महानगरपालिका हिस्सा व अन्य शासन अनुदानकरिता मनपा हिस्सासाठी खालील प्रमाणे रक्कम आवश्यक आहे.**

**१) सोलापूर शहराचा स्मार्ट सिटी योजना महानगरपालिकेचा हिस्सा र.रू. ५०.०० कोटी.**

**२) अमृत योजना अनुदान महापालिका हिस्सा २५% अंदाजे र.रू.१०.०० कोटी**



**३) पंतप्रधान आवास योजनेसाठी महापालिका हिस्सा म्हणून र.रू. १५.०० कोटी.**

**४) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) योमलनित्सारण व रस्ते प्रकल्पाकरिता प्राप्त अनुदानाचे ३०% महानगरपालिका हिस्सा र.रू. ७०.०० कोटी इतकी रक्कम कर्ज रूपाने उभारणे आहे. सदर कर्जाच्या फेडीकरिता दरवर्षी र.रू.३०.०० कोटी इतकी रक्कम आवश्यक आहे.**

**५) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेकरिता प्राप्त अनुदानाचे ५०% हिस्सा र.रू. १० कोटी इतकी आवश्यक आहे.**

**६) तसेच घनकचरा व्यवस्थापना करिता मा. शासनाकडून १४व्या वित्त आयोगाअंतर्गत अनुदान प्राप्त होणार असेल तरी सदरचे अनुदान इतर अत्यावश्यक कामासठी वापर करणेबाबत ही आदेश वेळोवेळी निर्गमित होत असतात. त्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापना किमान ८.०० कोटी इतकी रक्कम लागणार आहे.**

**७) सोलापूर शहरास पाणीपुरवठा करणेकामी उजनी धरणातून भिमा नदी द्वारे पाणी सोडणेसाठी जलसंपदा विभागाकडे प्रत्येक खेपेस अंदाजे र.रू.३ ते ५ कोटी रक्कम भरावी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**उपरोक्त प्रमाणे काही रक्कम हे आजला जरी अंदाजपत्रकात तरतूद केली असली तरी उर्वरीत तरतूद न केलेली रक्कम भविष्यात सन २०१७–१८ च्या सुधारित अंदाजपत्रकात तरतूद करावी लागणार आहे.**

तसेच सन २०१४-१५,सन २०१५-१६ चा चालु वर्ष सन २०१६-१७ मध्ये विविध विकास कामे करिता दिलेल्या बजेट अभिप्राय नुसार संबंधीत विभागाकडून लेखापरिक्षण होऊन या कार्यालयाकडे आदायगी करिता प्राप्त झालेल्या बिलांची रक्कम मोठ्या प्रमाणात थकीत असून,माहे मार्च २०१७ अखेर यात आणखी वाढ होणार आहे. तसेच सेवानिवृत सेवकांचे थकीत देय पेन्शन विक्री,ग्रॅच्युईटी इ.करिता मोठ्या प्रमाणात रक्कम थकीत आहे याचा ही विचार होणे आवश्यक आहे.

वरील रक्कमेचे नियोजन होणेचे अनुषंगाने आर्थिक शिस्ती बाबत कडक धोरण अवलंबून मनपास प्राप्त होणारे सर्वप्रकारचे महसूली उत्पन्न काटेकोरपणे वसूल करणे व अनावश्यक खर्चात कपात करणे आवश्यक आहे.

तसेच सन २०१४-१५ व २०१५-१६ शहर व हद्दवाढ भागात विविध विकास कामे करणे या बजेट सदरातून एकूण र.रू.२२९,०८,३१,२२६/- इतक्या रक्कमेचे कामे सुचविणेत आलेले असून,सदर कामापैकी किती कामांना वर्क ऑर्डर दिलेली आहे व किती कामांना वर्क ऑर्डर दिलेली नाही याची तपासणी करून यामध्ये वर्क ऑडर न दिलेल्या कामाचे पाणीपुरवठा,ड्रेनेजलाईन, रस्ते, आरोग्य, दिवाबत्ती या प्रमाणे प्राधान्यक्रम ठरवून त्याप्रमाणे अत्यावश्यक तेवढीच कामे हाती घेणे उचित होणार आहे. तसेच महापालिकेतील कर्मचाऱ्यांना सध्या वैद्यकीय प्रतिपूर्ती पोटी रक्कम आदा करणेत येते यासाठी



दरवर्षी र.रू. २ कोटी खर्च करण्यात येत असते. या ऐवजी महानगपालिकेच्या सर्व सेवकांचे मेडीक्लेम पॉलीसी उतरविणे आवश्यक आहे. जेणेकरून महापालिकेच्या फंडातून वैद्याकी प्रतिपूर्तीसाठी देण्यात येत असलेली र.रू.२ कोटीची बचत होणार आहे. तसेच सध्या प्रतिमहा र.रू. ४ कोटी वीज बिलाची रक्कम महापालिकेस भरावी लागते. याचा विचार करून विज बचतीबाबत योग्य ते धोरण अवलंबविणे आवश्यक आहे.

अंदाजपत्रकामध्ये सुचविण्यात आलेली महसुली जमा योग्य प्रकारे वसुली आणणेसाठी सेवकांना कठोर भूमीका घेऊन वसुली आणणे व प्रशासकीय खर्च कमी करणे व उत्पन्नात वाढ करणे याशिवाय पर्याय नाही. अन्यथा भविष्यात आर्थिक अडचणीना सामोरे जाण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.

एकंदरीत सदरचे अंजदापत्रक तयार करणेकामी सर्व खाते/शाखा प्रमुखांचे सहकार्य मिळालेले असून ,ते धन्यवादास पात्र आहेत.

**दत्तात्रय रं. लोंढे**
मुख्यलेखापाल

**अभिजीत हराळे**
मा.सहा.आयुक्त (म)

**वि.ना.काळम**
मा. आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

## ※ ठळक वैशिष्ट्ये ※

- **स्मार्ट सिटी** – शहरातील लोकांचे राहणीमान,जीवनमान सुधारणा करणे करिता,शास्वत करणेकरिता व परिसर सर्व सोयीयुक्त करणेकरिता मा.पंतप्रधान महोदय यांनी स्मार्ट सिटी योजनेची संकल्पना दि. २५/६/२०१५ रोजी घोषित केली. त्या अनुषंगाने देशातील प्रथमतः १०० स्मार्ट शहरे निवडणेकरिता स्पर्धात्मक पध्दतीने निवड करणेचे घोषित करणेत आले.
- दि. २८/१/२०१६ रोजी केंद्र शासनाकडून स्मार्ट सिटी स्पर्धेची प्रथम २० शहरांची नांवे घाषित करणेत आली असून, त्यामध्ये सोलापूर शहराचा ९ वा क्रमांक घोषित करणेत आला .
- सदर योजनेमध्ये प्रतिवर्षी सोलापूर महानगरपालिकेस पुढील ५ वर्षा करीता र.रू. ५०.०० कोटी इतक्या रक्कमेची तरतूद स्वः हिस्सा म्हणून करणे आवश्यक आहे.

सदर योजना आराखड्यात,I

१) १०० % कचरा व्यवस्थापन

२) नॉन मोटारायईझ्ट ट्रान्सपोर्ट करिता पायाभूत सुविधा करणे सुधारणा करणे

३) सायकल ट्रक तयार कपणे

४) क्लीन व इफिशियंट एनर्जी वापर करणे.

५) इफिशियंट ट्रान्सपोर्टेशन तयार करणे

६) एफिशियंट पाणीपुरवठा करणे.

७) एफिशियंट वेस्ट वॉटर रिसायकिलिंग करणे

८) एफिशियंटसार्वा. ठिकाणचा योग्य वापर करणे.

९) शहरी गरीबांकरिता घरे बांधणे.



१०) पॅन सिटी सॉल्युशन देणे

- केंद्र शासनाच्या प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार स्मार्ट सिटीचे अपेक्षित काम जल्द गतीने पुर्ण होणे करिता स्वतंत्र प्राधिकरण (Special Purpose Vehicle-Spv) दि. १४/३/२०१६ नुसार स्थापना करणेत आली असुन,सोलापूर सिटी डेव्हल्पमेंट कॉर्पोरेशन लि. (SCDCL) नावाने दि. २३/३/२०१६ रोजी कंपनीची नोंदणी करण्यात आले आहे.
- देगांव मलनित्सारण केंद्रापासून टर्सरी ट्रीटमेंट करून N.T.P.C साठी पाणी वापरास देणेचे नियोजन P.P.P. वर करणेची असून , त्या अनुषांगाने महानगरपालिकेस करावे लागणारे कामासाठी खर्च करावा लागेल. सदर नियोजनामुळे NTPC साठी घालण्यात आलेले पाईपलाईन मधून ७५ एमएलडी पाणी महापालिकेस उपलब्ध होईल.
- **उजनी– सोलापूर दुहेरी पाईपलाईन** : एन.टी.पी.सी प्रकल्पाकडून टाकण्यात आलेल्या दोन पाईपलाईन पैकी एक पाईपलाईन (रॉ वॉटर ७५ दशलक्ष लिटर्स) सोलापूर महानगरपालिकेला वापरण्यात देऊन ७५ दशलक्ष लिटर्स ऐवजी ७५ दशलक्ष लिटर्स टर्शरी प्लॅन्ट मध्ये प्रक्रिया केलेले ट्रीटमेंट वॉटर सांडपाणी एनटीपीसी प्रकल्पाला देण्यात बाबत एनटीपीसी प्रकल्पाने दोन पाण्याचे पाईपलाईन प्रत्येकी ७५ दशलक्ष लिटर्सची पाईपलाईन उजनी ते एनटीपीसी प्रकल्प या दरम्यान टाकलेली आहे.
- CRS फंडामधून दुहेरी पाईपलाईन कामासाठी NTPC रक्कम देणार आहे.

- सोलापूर महानगरपालिके कडून महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत सोलापूर शहर मलनित्सारण व्यवस्था सुधारणे या शासन मंजूर र.रू. १८७.३६ कोटी योजने चे काम चालु आहे. सदर योजने अंतर्गत सोलापूर मलवितरिका (ड्रेनेजलाईन) घालणेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच देगांव येथे ७५ MLD मलप्रक्रिया केंद्र (STP) बांधणेचे काम पूर्ण झाले असून सांडपाण्यावर सेकंडरी ट्रिटमेंट द्वारे प्रक्रिया करणे कामाची चाचणी चालु केलेली आहे. या मध्ये देगांव येथील प्रकल्पात मिथेन गॅसद्वारे विजनिर्मिती करणेत येत आहे. तसेच कुमठे येथे १२.५० (MLD) प्रताप नगर येथे १५ MLD STP चे काम जवळपास पूर्ण होत आलेले आहे. सदर तिन्ही STP मध्ये सेकंडरी ट्रिटमेंट केलेले सांडपाणी देगांव येथे जमा करून त्यावर टर्शरी ट्रिटमेंट करून प्रक्रिया केलेले सांडपाणी NTPC प्रकल्पास कुलिंगकरिता देणेबाबत नियोजन करणेत आलेले आहे. याबाबत DPR तयार केले असून ,NTPC सोबत करार करणेची कार्यवाही अंतीम टप्प्यात आलेली आहे.
- **प्रधान मंत्री आवास योजना :** सोलापूर शहरातील झोपडपट्टीवासिय व आर्थिक दुर्बल घटक व उत्पन्न गट यांच्या आपल्या स्वतःच्या हक्काच्या घरासाठी प्रधानमंत्री आवास योजनेची अमंलबजावणी करणेत येत आहे. सोलापूर शहर सर्वांसाठी घरे कृती आराखडा तयार करण्याचे व तदअनुषंगिक सर्व्हेक्षणाचे काम एनव्हयरोसेफ कन्सलटंसटस,सोलापूर यांना देण्यात आले असुन ,सोलापूर महानगरपालिकेकडून स्वतंत्र शहर तांत्रिक कक्ष स्थापन करण्यात आलेले आहे. सदरहु कामासाठी महानगरपालिका हिस्सा र.रू.



१५.०० कोटी ची अर्थ संकल्पात तरतूद सुचविण्यात आलेली आहे.

- भांडवली मुल्यवर्धीत कर प्रणाली राबविण्यात येणार असून त्यानुसार सर्व मिळकत करांचे GIS प्रणाली द्वारे सर्वेक्षण करून टॅक्सची आकारणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नवाढीव मध्ये वाढ होणार आहे.
- GIS प्रणाली अंतर्गत Field Survey च्या माध्यमातून सोमपाकडे असलेल्या मिळकती शहर,हद्दवाढ व गवसु कडील सर्व मिळकतींचे पुनर्मुल्याकर करणेचे काम चालु आहे. आजमितीस सो.म.पा कडे नोंद असलेल्या एकूण २,३५. लाख इतक्या मिळकती आहेत. GIS च्या माध्यमातून ४८ पेठांचे सर्व्हेचे काम पूर्ण झालेले असून ,एकुण मिळकती विभागाकडील मिळकतींची नोंद घेणेत आलेले आहे. अद्याप गवसू विभागाचे काम राहिलेले आहे. सदर सर्व्हेचा अहवाल पाहता आजला अंदाजीत १२.५% इतकी नवीन मिळकतींची नोंदणीची माहिती निदर्शनास आली असून संबंधीत खात्याकडून पडताळणीचे काम चालु आहे. तसेच शहर व हद्दवाढ विभागाकडे असलेल्या मिळकत करांचे Demand मध्ये देखील अंदाजे २५ ते ३०%नी Demand मध्ये वाढ दिसून येत आहे. त्यानुसार महानगरपालिकेस अंदाजीत रक्कम रूपये ३० ते ३५ कोटी रूपयांचे उत्पन्नास वाढ दिसून येईल.
- त्याच प्रमाणे सदरच्या प्रक्रियेनंतर संपूर्ण मालमत्ता कराची यंत्रणाही संगणकीकरण करून Web Based करणेत येणार असल्याने या मध्ये पारदर्शकता व गतिमानता तसेच सुसूत्राता येणार आहे.
- Right to Service द्वारे सोलापूर महानगरपालिकेने आजला एकूण १५ सेवांचे ऑनलाईन सर्व्हिसेस चालु करणेत आलेले आहे. त्यामध्ये

जन्म/मृत्यू प्रमाणपत्र ,मालमत्ता कर उतारा देणे, थकबाकी नसल्याचा दाखला देणे .भाग नकाशा देणे , बांधकाम परवाना देणे इ. सेवांचा समावेश आहे.

- **स्वच्छ महाराष्ट्र अभियान :** स्वच्छ भारत मिशनच्या धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान संचालनायाची स्थापना करून महाराष्ट्र शासनाने ३१ मार्च २०१७ पर्यंत राज्यातील शहरी भाग हगणदारी मुक्त करण्याचे उद्दिष्टे डोळ्यापुढे ठेवून सर्व महानगरपालिका, नगरपालिका यांना स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) प्रभावीपणे राबविण्यासाठी सवच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाची स्थापना करून शासनाने दिलेले वैयक्तिक शौचालय, सामुदायिक/सार्वजनिक शौचालय चे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करणे, ३१ मार्च २०१७ पर्यंत शहर हगणदारी मुक्त करणे , तसेच घरोघरी कचरा उचलणे , संकलन करणे,वाहतुक व प्रक्रिया करणे, शुन्य कचरा मोहिम राबविणे इ. करिता आत्यधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेने जुलै २०१५ मध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्षाची स्थापना केली.
- **वैयक्तिक शौचालय –** प्रति लाभार्थी अनुदान र.रू. १५०००/– (स्वच्छ भारत मिशन र.रू. १२०००– व १४वे वित्त आयोग अनुदान र.रू. २०००/– तसेच मनपा हिस्सा र.रू. १०००/–) वैयक्तिक शौचालय लाभार्थी निवड करून लाभार्थींना त्यांच्या खात्यावर ऑनलाईन पध्दतीने प्रथम र.रू. ६०००/– हप्ता वितरीत केला जातो. लाभार्थ्यांने शौचालय बांधकाम पूर्ण करून वापर सुरू झाल्याची खात्री करून त्याचा जीओ टॅग फोटा स्वच्छ भारत मिशन पोर्टल वर अपलोड केल्यानंतर उर्वरित र.रू. ९०००/– चा अंतीम



हप्ता सदर लाभार्थ्यांच्या खात्यावर ऑनलाईन वितरीत केला जातो.

- **अमृत अभियान –** शहरातील रहिवाशांना पाणीपुरवठा, मलनित्सारण नागरी परिवहन पुरविणे, शहरामध्ये प्रामुख्याने गरीबांसाठी नागरी सुविधांची निर्मिती शहरातील नागरीकांना राहणीमानाचा दर्जा सुधारणे हे देशाचे तसेच राज्याचे प्राधान्य आहे. शहरातील प्रत्येक घरासाठी प्रचलित निकषानुसार पाणीपुरवठा करणे, शहराच्या स्वच्छते करीता मलनितसारण, मलव्यवस्थापन व पर्जन्यजल वाहिनीची व्यवस्था करणे, शहरामध्ये मोकळ्या जागा, हरित क्षेत्रे, शहरातील परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करून प्रदुषण कमी करणे व इतर सुविधांची निर्मिती करणे इ. उद्दिष्टे करण्यासाठी केंद्र शासनाने अमृत मिशन हे महत्वकांक्षी अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने सदर अभियानामध्ये सोलापूर शहराचा समाविष्ट असून, यासाठी प्राप्त अनुदानाच्या अनुषंगाने मनपा हिस्सा म्हणून र.रू.१०.०० कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करणेत आलेली आहे.